# बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी

किर्तीकुमारना उईके
आचार्य पदवी विद्यार्थी (कृषी वनस्पतीशास्त्र विभाग)
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

शेतकरी हा जगाचा पालनकर्ता आहे. बियाणे हे शेतीचे मूलभूत साधन आहे. बियाण्याशिवाय शेती हा शब्दच नाही. शेतकऱ्यांसाठी पेरणीही सर्वात महत्वाची वेळ असते. चांगले उत्पन्न मिळण्याकरिता शुद्ध व दर्जेदारप्रतीचेबियाणे आवश्यक असते. शेतकऱ्यांचीफसवणूक होवू नये व दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावे यासाठी अधिनियम १९५५ या कायद्यातंर्गत बी बियाणे अधिनियम १९६८ मध्ये कायदे तयार करण्यात आले आहेत.या कायद्यानुसार अधिसूचित जातींचे बियाणांची उत्पादन व विक्री केली जाते. हा कायदा सर्व भारतात १ ऑक्टोबर १९६९ पासून अमलात आला आहे. लागवडीसाठी दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.शेतकर्यांना बोगस बियाणे यांसारख्या संकटापासून वाचण्याकरिता खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

- बियाण्यांचे प्रकार:

पैदासकार बियाणे (Breeder seed) - टॅगचा रंग पिवळा
पायाभूत बियाणे (Foundation seed) - टॅगचा रंग पांढरा
प्रमाणित बियाणे (Certified seed) - टॅगचा रंग निळा
सत्यतादर्शक बियाणे (Truthful seed) - टॅगचा रंग हिरवा

- कोणत्याही वाणांच्या बियाणांची निवड करण्यापूर्वी तालुक्याला असलेले कृषी विभाग येथील कृषी अधिकारी, वैज्ञानिकयांच्यांशी चर्चा करून नवीन, सुधारित, संकरित वाणाची माहिती घ्यावी.
- आज मार्केट मध्ये खूपशाकंपनीचे बियाणे विक्रीसाठी असतात. कोणत्या कंपनीचे बियाणे विकत घ्याचे या सम्बन्धित तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा कृषि अधीक्षक यांचा सल्ला घ्यावा.
- बियाणांची खरेदी नेहमी परवानाधारक विक्रेत्यांकडूनच करायची. बियाणे खरेदी करताना बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडून प्रमाणित केलेल्या बियाणास प्राधान्य द्यावे. शक्यतो कृषी विद्यापीठे किंवा विद्यापीठाचे संशोधन केंद्राकडे बियाणे उपलब्ध असेल तर तेथूनच ते खरेदी करावे.
- बियाणे गुणवत्ता दर्शवणारी खुणचिठ्ठी (tag) बियाण्याच्या पिशवीला लावलेली असते, ती नीट तपासून घ्यावी. या खूणचिठ्ठीवर बियाणांचा कमीत कमी मूल्याचा दर्जा दाखवणारी माहिती असते.
- पिकाचे नाव, जात, प्रकार, गट क्रमांक, बीज परीक्षणाची तारीख, उगवणशक्ती (%), शुद्धतेचे प्रमाण, बियाण्याचे एकूण वजन, विक्रेत्याचे नाव व पत्ताआणिबियाणे प्रमाणित करणाऱ्या अधिकार्याची सही आणि हुद्दा नमूद केलेला असतो. बियाण्याच्या पिशवीवर माहिती छापलेली असते ती वाचून व तपासून घ्यावी. बियाणाचे लेबलही तपासून घ्यावे.
- बियाणाची वैधता तपासणी दिनांकापासून नऊ महिने असते तर नुतनीकरण केलेल्या बियाणाची वैधता सहा महिन्यांपर्यंत असते.
- बियाणे पिशवी ही तिन्ही व वरील बाजू प्रमाणपत्रासह शिवलेली असावी.
- खरेदीची पक्की पावती बियाणे विकतघेताना घ्यावी. शेतकऱ्याचे पूर्ण नाव, पिकाचे नाव, प्रकार, जात, प्लॉट नंबर त्याच बरोबर उत्पादकाचे नाव व विक्रेत्याची सही इत्यादींची नोंद करून घ्यावी.
- पावतीवर विक्रेत्याची व शेतकऱ्यांची सही वा अंगठा असल्याशिवाय पावती स्वीकारू नये. बियाणे खरेदी पावतीवर छापील पावती क्रमांक असल्याची खात्री करावी.
- पिशवीवर किंमत छापणे कायद्याने बंधनकारक आहे. बियाणे पिशवीवर असलेल्या किमतीपेक्षा जास्त दराने खरेदी करू नये.
- बियानाच्या पिशवीवर किंमत छापलेली नसल्यास किंवा विक्रेता जास्त दराने विकत असल्यास, जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत असणाऱ्या वजनमाप निराक्षकाच्या निदर्शनास ही बाब आणून द्यावी.
- बियाणे पिशवी नेहमी खालील बाजूने फोडावी. जेणेकरून पिशवीला असलेले लेबल व टॅग सुरक्षित राहील. हे लेबल, टॅग जपून ठेवावे.मुदतबाह्य तसेच पॅकिंग फुटलेली सुटे बियाणे खरेदी करू नये.
- बियाणे पिशवी फोडल्यानंतर सर्व प्रथम बियाणांची उगवण क्षमता करून व टॅग वर दिल्या नुसार आहे कि नही याची पुष्टी करून घ्यावी. प्रमाणापेक्षा उगवणक्षमता कमी आढळल्यास किंवा बियाने भेसळ आढळल्यासजिल्ह्यातअसलेले गुणनियंत्रण निरीक्षक निरीक्षकाकडे लेखी तक्रार करावी.
- शेतकरी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद कृषी विभागाकडे लेखी तक्रार करू शकतात.
- संबंधित विक्रेता व बियाणे उत्पादन कंपनी दोषी आढळल्यास बियाणे कायदा १९६६ मधील कलम १० नुसार कायदेशीर कार्यवाही केली जाते.
- बियाण्याविषयी काही तक्रार असेल तर तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती किंवा जि. प. कृषी विभागाकडे लेखी तक्रार द्यावी.

(संपर्क: +९१ ९४०४४९८४७३
७९७२८९१६९१)

★ ★ ★